टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (ट्रस्ट), पुणे संचलित इंदुताई कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, पुणे या संस्थेच्या महाविद्यालयाचे नाव बदलण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक : पीएसओ-२०२१/प्र.क्र.२७२/२१/शिक्षण-१
९ वा मजला, गो.ते.संकुल, लोकमान्य टिळक मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक:१५ नोव्हेंबर, २०२१.

वाचा :- १. शासन निर्णय क्र.एनयुआर-२०१२/प्र.क्र.६२७/१२/शिक्षण-१, दि.१२.०५.२०१३.
२. शासन निर्णय क्र. पीएसओ-२०१९/प्र.क्र.३६/१९/शिक्षण-१, दि.१३.०९.२०१९.

प्रस्तावना :-

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (ट्रस्ट), पुणे संचलित इंदुताई कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, पुणे भौतिकोपचार महाविद्यालय सुरु करण्यास संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. इंदुताई कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, पुणे हे महाविद्यालय टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (ट्रस्ट), पुणे या संस्थेच्या अंतर्गत होते. संस्थेने सदर महाविद्यालयाच्या नावामध्ये "टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (ट्रस्ट), पुणे संचलित इंदुताई कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, पुणे" ऐवजी बदलून "टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (ट्रस्ट), पुणे संचलित इंदुताई टिळक कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, पुणे" याप्रमाणे बदल करण्याची विनंती केली होती. त्यानुसार संस्थेच्या नावात बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (ट्रस्ट), पुणे संचलित इंदुताई कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, पुणे भौतिकोचार अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयाचे नाव "टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (ट्रस्ट), पुणे संचलित इंदुताई टिळक कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, पुणे" असे करण्यास खालील अटीच्या अधीन शासनाची मंजुरी देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :-

१) सदर महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या तसेच महाविद्यालयाच्या प्रशासनाच्या हितास कोणत्याही प्रकारची बाधा येणार नाही.
२) संस्थेच्या रुग्णालयातील रुग्णांच्या व रुग्णालय प्रशासनाच्या हितास कोणत्याही प्रकारची बाधा येणार नाही.

Scanned with CamScanner

३) संस्थेच्या स्थावर जंगम मालमत्तेस तसेच इतर मिळकतीवर कोणत्याही प्रकारची गदा येणार नाही.

४) संस्थेच्या महाविद्यालयाच्या नावात वरीलप्रमाणे बदल केल्यामुळे या संदर्भात भविष्यात कोणतीही कायदेशीर अडचण निर्माण झाल्यास त्यास सर्वस्वी संस्था जबाबदार राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(डॉ. श्रीनिवास पुं. कोतवाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (वै.शि.), यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (वै.शि.) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई.
७. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
८. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
९. सचिव, प्रवेश नियामक अधिकारी, ८ व ९ वा मजला, न्यु एक्सेलसिअर बिल्डिंग, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१.
१०. सचिव, शुल्क नियामक अधिकारी, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ३०५, ३रा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
११. सचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (ट्रस्ट), विद्यापीठ भवन, मुकुंद नगर, गुलटेकडी, पुणे-४११०३७.
१२. अवर सचिव, शिक्षण-२, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. निवडनस्ती (शिक्षण-१).

Scanned with CamScanner